प्रभू, तो मी तर नाही?

(डॉ. रंजन केळकर, पुणे)

प्रभू, सुरुवातीला किती तरी लोक शिष्य म्हणून तुझ्या मागे आले होते. पण त्यांच्यातले कित्येक तुला नंतर सोडूनही गेले. फक्त बारा जण तुला एकनिष्ठ राहिले. त्या निवडलेल्या शिष्यांचे तू मुलांसारखे संगोपन केलेस. त्यांना नेमून दिलेल्या कामासाठी त्यांना लायक बनवलेस. तरी पण तुला त्यांना सांगावे लागले होते, "तुमच्यातल्या एकात सैतान आहे." जेव्हा तू तुझ्या शिष्यांचे पाय धुतलेस तेव्हा तू म्हणालास, "तुम्ही शुद्ध आहात, पण सगळे नाही." नंतर, त्या शेवटच्या संध्याकाळी तू त्या बारा जणांबरोबर जेवायला बसला होतास आणि तू त्यांना म्हणलास, "मी तुम्हांला सत्य सांगतो, तुमच्यातला एक जण मला धरून देईल." तेव्हा ते सगळे फार अस्वस्थ आणि दुःखी झाले आणि प्रत्येक जण तुला विचारू लागला, "प्रभू, तो मी तर नाही?" प्रभू, तुझे शिष्य तुझ्याबरोबर साडेतीन वर्षे राहिले होते. मी तर बाळपणापासून तुझा शिष्य आहे. पण प्रभू, मला सांग, मी कधी तुझा विश्वासघात तर करणार नाही ना? माझ्या रोजच्या भाकरीसाठी मी तुला तीस रुपयांना विकणार तर नाही ना? प्रभू, तो मी तर नाही?

प्रभू, तुझ्या पहिल्याच प्रवचनात तू सांगितले होतेस, "तुम्ही आपल्या जिवाविषयी किंवा शरिराविषयी काळजी करू नका. आकाशातले पक्षी पहा, ते पेरीत नाहीत, कापणी करीत नाहीत किंवा कोठारांत साठवीत नाहीत. रानातली फुले बघा, ती कष्ट करीत नाहीत किंवा कातीत नाहीत. अहो तुम्ही अल्पविश्वासी, तुम्हाला कोणत्या गोष्टींची गरज आहे हे तुमचा स्वर्गातला पिता जाणतो." पण प्रभू, माझे जीवन फार योजनाबद्ध आहे असे मी मानतो. उद्या काय काय करायचे आहे ह्याची यादी केल्याशिवाय मी रात्री झोपत नाही. तुझी मदत न घेता माझा संघर्ष स्वतःच लढायचा मी प्रयत्न करत असतो. प्रभू, मला सांग, तुझ्या पुरवठ्याऐवजी माझ्या स्वतःच्या साठ्यावर विसंबून राहणारा तो अल्पविश्वासी मी तर नाही?

प्रभू, तू म्हणाला होतास, "जो कोणी माझी वचने ऐकतो पण त्याप्रमाणे करीत नाही तो एका मूर्ख माणसासारखा आहे. त्याने आपले घर वाळूवर बांधले. मग पाऊस पडला, पूर आला, वारे सुटले आणि ते घर कोसळले." प्रभू, मला सांग, तुझे न ऐकणारा अणि स्वतःचेच करणारा तो मूर्ख मनुष्य मी तर नाही?

प्रभू, तुझे शिष्य एकदा मोठ्या वादळात सापडले होते. जोरदार वारे वाहात होते आणि उंच उंच लाटा उठत होत्या. त्यांचा मचवा हेलकावत होता. ते फार घाबरून गेले होते. ते म्हणाले, "प्रभू, आम्हाला वाचवा, आम्ही बुडत आहोत." पण तू झोपलेला होतास. तू उठलास आणि त्यांना म्हणालास, "अहो अल्पविश्वासी, तुम्ही असे भितरे कसे?" तू उठलास आणि तू वादळ शांत केलेस. प्रभू, माझ्या जीवनात जेव्हा वादळे येतात, तेव्हा मला नेहमी वाटते

की, तुला माझी पर्वाच नाही, तू गाढ झोपलेला आहेस. वादळी वाऱ्यात माझा विश्वास डळमळीत होतो. प्रभू, मला सांग, तो अल्पविश्वासी भितरा मनुष्य मी तर नाही?

प्रभू, एकदा तुझ्या वाटेवर दहा कुष्ठरोगी तुझी दूरून वाट बघत होते. त्यांनी तुला विनवणी केली, "आमच्यावर दया करा." तेव्हा तू त्यांना म्हणालास, "जा आणि स्वतःला याजकांना दाखवा." ते चालत जात असतानाच शुद्ध केले गेले. आपण बरे झालोत हे त्यांच्यातल्या एकाने बघितले तेव्हा तो तुझ्याकडे परत आला. मोठ्या आवाजात देवाचे गौरव करत आणि तुझे उपकार मानत तो तुझ्या पाया पडला. तेव्हा तू विचारलेस, "दहा रोगी शुद्ध केले गेले होते ना? मग बाकीचे नऊ कुठे आहेत?" आणि तू त्याला म्हणालास, "ऊठ आणि जा, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे." प्रभू, तू मलाही अनेकदा बरे केले आहेस, आरोग्य दिले आहेस. पण मला सांग, त्या नऊ कृतघ्न माणसांपैकी एक मी तर नाही?

प्रभू, तुझ्या मरणापूर्वी काही दिवस आधी तू तुझ्या शिष्यांना म्हणाला होतास, "मी जिकडे जाणार आहे तिकडे तुम्हाला माझ्यामागे येता येणार नाही." त्यावर तुझा एक शिष्य म्हणाला होता, "प्रभू, का नाही? मी तुझ्याकरता माझा जीवदेखील देईन." तू त्याला विचारलेस, "तू माझ्याकरता तुझा जीव देशील का?" आणि म्हणालास, "मी तुला सत्य सांगतो, तू मला तीनदा नाकारशील तोपर्यंत कोंबडा आरवणार नाही." प्रभू, मीपण तुझा शिष्य आहे. मीपण तुझ्याबरोबर चालत आलो आहे. पण प्रभू, कधी असे तर होणार नाही की, तू पुढे जाशील आणि मी तुझ्यामागे सुरक्षित अंतर ठेवून चालेन? तू छळ सोसशील आणि मी विस्तवाची ऊब घेत बाहेर उभा राहीन? किंवा लोक मला तुझ्याविषयी विचारतील आणि मी म्हणेन की, मी तुला ओळखत नाही? प्रभू, मला सांग, तो मी तर नाही?

प्रभू, तुला वधस्तंभावर खिळले होते ते दोन चोरांच्या मध्ये. त्या दोघांना त्यांच्या गुन्ह्यांसाठी मरणाची शिक्षा देण्यात आली होती. येणारे जाणारे लोक तुला बघून तुझी चेष्टा करीत होते. पण एवढेच नाही. तर तुझ्या बाजूला खिळलेले ते दोन चोरदेखील तुझी निंदा करीत होते. वधस्तंभावर टांगलेल्या अवस्थेत त्या गुन्हेगारांतल्या एकाने तुला चिडवले, "तू ख्रिस्त आहेस ना? मग स्वतःला वाचव आणि आम्हालाही वाचव." पण दुसऱ्या चोराने हे ऐकले तेव्हा तो त्याला म्हणाला, "आतासुद्धा तुला देवाची काही भीती वाटत नाही का? आपण गुन्हे केले म्हणून आपल्याला शिक्षा मिळाली. आपण खरोखर दोषी आहोत. पण ह्या माणसाचा काय दोष होता?" आणि त्याने तुला विनंती केली, "प्रभू, तू आपल्या राज्यात येशील तेव्हा माझी आठवण कर." आणि तू त्या चोराला म्हणालास, "मी तुला सत्य सांगतो, आज तू माझ्याबरोबर सुखलोकात असशील." प्रभू, तू आपल्या राज्यात येशील तेव्हा माझी आठवण करशील ना? तुझ्या वैभवात तू मला विसरणार तर नाहीस ना? प्रभू, मला सांग, तो चोर मीच ना?